# नियमित फौजदारी खटला क्रमांक ११५/२०२५ मधील निशाणी क्रमांक १८ खालील आदेश

**(CNRNO-MHRT080005852025)**

अभियोगपक्षातर्फे प्रस्तुतचा अर्ज संबंधीत तपासीक अधिकारी यांनी सी.सी.टी.व्ही. फुटेज, दिनांक ०९/१०/२०२५ रोजी पो.शि./१२९ श्री. लोखंडे यांनी काढलेली छायाचित्रे व प्रमाणपत्र दाखल करण्यासाठी आदेश होणेबाबत दाखल केला आहे.

०२. अर्जात असे कथन आहे की, साक्षीदार – संदेश कापडी यांनी न्यायालयातील त्यांच्या साक्षीमध्ये तपासीक अधिकारी यांनी सी.सी.टी.व्ही. फुटेजमध्ये आरोपी दाखविलेबाबत कथन केले असुन सदरचे फुटेज दोषारोपपपत्रासोबत दाखल केले नाही. सदर फुटेज खटल्याच्या चौकशीकामी अत्यंत आवश्यक आहे.

०३. आरोपीतर्फे सदर अर्जावर आक्षेप घेण्यात आला आहे की, आरोपी हा न्यायालयीन कोठडीत आहे. दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी त्यांना पुरेसा अवधी होता. आरोपीचा बचाव उघड झाला आहे. फिर्यादी व साक्षीदारांनी आरोपीच्या बाजुने महत्वाच्या बाबी मान्य केल्या आहेत. त्या पुसण्यासाठी मागावुन खोटा पुरावा तयार करुन सदरचा अर्ज दाखल केला जात आहे. आरोपीच्या नैसर्गिक बचावावर याचा विपरीत परीणाम होणार आहे. पुराव्यातील उणीवा भरुन काढण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज असल्याने तो फेटाळण्यासाठी विनंती करण्यात आली आहे.

०४. दोन्ही बाजुंना ऐकले. अभिलेख पाहिले.

०५. प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षातर्फे एकुण ०४ साक्षीदारांना तपासण्यात आले आहे. पैकी साक्षीदार क्रमांक ०४ यांचा उर्वरीत सरतपास पुर्ण झालेला नाही. सदर साक्षीदाराने सरतपासात त्यांच्या दुकानातील सी.सी.टी.व्ही. फुटेज पोलीसांना दिले असल्याचे कथन केले आहे. परंतु, दोषारोपपत्रामध्ये सदरचे सी.सी.टी.व्ही. फुटेज जप्त केलेबाबतची कागदपत्रे दिसुन येत नाहीत. पुर्ण दोषारोपपत्रावरुन सदरचे सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासीक अधिकारी यांनी तपासा दरम्यान कायदेशीर तरतुदीनुसार जप्त केले होते, असे दिसुन येत नाही. अशा परिस्थीतीत, सदर सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासीक अधिकारी यांना दाखल करणेबाबतचा आदेश करणे न्यायोचीत होणार नाही. तसा आदेश केल्यास तपास कामातील त्रुटी भरुन काढण्यासाठी अभियोगपक्षाला संधी दिल्यासारखे होईल व त्यामुळे, आरोपीच्या बचावावर विपरीत परिणाम होवुन त्याच्यावर अन्याय होईल. त्यामुळे, अभियोगपक्षाची सदरची विनंती न्यायोचीत वाटत नाही.

०६. दिनांक ०९/१०/२०२५ रोजीचे छायाचित्रे व प्रमाणपत्र दाखल करण्याचा आदेश होण्यासाठी अर्जात विनंती करण्यात आली आहे. साक्षीदार क्र. ०३ – आकाश शेटये यांनी पंचनाम्यावेळी पोलीस अधिकारी श्री. गावीत यांच्या मोबाईलवर छायाचित्रे घेवुन ती ई–साक्ष ॲपमध्ये अपलोड केली होती, असे कथन केले आहे. सदर साक्षीदाराचा उलटतपास पुर्ण झालेला आहे. दोषारोपपत्रामध्ये पो.शि. श्री. विवेक रसाळ यांचे कलम ६३(४)क अन्वये, प्रमाणपत्र व त्यासोबत संबंधीत व्हीडीओचे पुर्ण तपशील देण्यात आले आहेत. परंतु, घटनास्थळाचा पंचनामा करताना त्याबाबत छायाचित्रण केले होते व त्याची छायाचित्रे घेवुन संबंधीत साक्षीदाराचे कायदेशीर तरतुदीनुसार प्रमाणपत्र जोडण्यात आल्याचे दोषारोपपत्रामध्ये दिसुन येत नाही.

०७. सदर घटनास्थळ पंचनाम्यामध्ये ई–साक्ष ॲपद्वारे मोबाईलमध्ये पंचनामा करण्यात आला असुन घटनास्थळाची छायाचित्रे पो.शि.१२९ श्री. लोखंडे यांच्या मोबाईलवर काढल्याचे नमुद करण्यात आले आहे. दोषारोपपत्र सादर करताना सदरची छायाचित्रे व त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते. ते सादर न करण्याचे कोणतेही संयुक्तिक कारण अभियोगपक्षातर्फे स्पष्ट करण्यात आले नाही. अशा परिस्थीतीत, सदर छायाचित्रे व आवश्यक ते प्रमाणपत्र तपासीक अधिकारी यांना दाखल करणेबाबतचा आदेश करणे न्यायोचीत होणार नाही. तसा आदेश केल्यास तपास कामातील त्रुटी भरुन काढण्यासाठी अभियोगपक्षाला संधी दिल्यासारखे होईल व त्यामुळे, आरोपीच्या बचावावर विपरीत परिणाम होवुन त्याच्यावर अन्याय होईल. त्यामुळे, अभियोगपक्षाची सदरची विनंती न्यायोचीत वाटत नाही. सबब, पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे –

**आदेश**

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.02.21 18:16:26 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**न्यायदंडाधिकारी वर्ग – १ देवरुख,**

**जि. रत्नागिरी.**

**दिनांक २१/०२/२०२६**

**देवरुख.**

-: **CERTIFICATE** :-

I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Order/Judgment .

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. A. Bhale |
| Court Name | : | The Court of Civil Judge Junior Division and Judicial Magistrate F.C., Deorukh. |
| Date of Decision | : | 21/02/2026 |
| Order signed by Presiding Officer on | : | 21/02/2026 |
| Order uploaded on | : | 21/02/2026 |